## अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक १४/०८/२०२३ चे ००.०१ ते २४.०० वा.

➤ **दुखापत :- ०१**

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो.स्टे. गाडगेनगर अम. अप.क्र. १०१७/२३ कलम ३२५,३२३ भा.द.वि. | रामपुरी कम्प भिमनगर अमरावती | दि. १३.०८.२३ चे २२.०० वा दि. १४.०८.२३ चे ०९.५८ वा | कन्हैय्या आमलदास आहुजा वय ४८ वर्ष. रा. रामपुरी कम्प अमरावती | छोटु भुयार | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी घरी असताना नमुद आरोपीची मुलगी फि.च्या घरी आली असता फि.ने तिला म्हटले की, तु बेटझिं घरी जा या कारणावरुन आरोपी फि.च्या घरी आला व फि.चे गच्ची पकडुन लाथाबुक्याने मारहाण केली व फिर्यादीच्या उजव्या पायावर हथोडीने मारले तर फि.च्या उजव्या पायाला सुज आली त्या कारणाने डॉ.सा नी एक्सरे काढण्यास सांगितले असुन फिच्या गळया खाली नखाचे वरखडे आहे .पायायला सुज आल्याने फि.ला चालता सुध्दा येत नाही.नंतर ११२ वर कॉल केला असता फिच्या घरी पो. गेली व फिला इर्विन दवा. येथे भरती केले अशा फि.चे बयाणावरुन व मेडी. सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल |

विनयभंग :- ०१

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | वलगाव अप क्र.255/2023 कल 354,354(अ) 452 भादवि. | ग्राम नय अकोला फि.चे राहते घरी. | दि.14/08/2023 चे 13/00 वा, दाखल ता. 14/08/2023 चे 18/45 वा. | **एक महीला** | पवन साहेबराव जवंजाळ वय 30 वर्ष रा.बोर्डी ता.अचलपुर जि.अमरावती | . हकीकत अशा प्रकारे आहे.कि,फिर्यादी आणी आरोपि यांची ईस्ट्राग्राम वर ओळख झाली त्या नंतर फिर्यादिचे व आरोपि चे मोबाईलवर बोलने चालु होते.त्या नंतर जुलै 2023 घरी आला तेव्हा त्याने फिर्यादिस तीची आत्या चा पुतण्या असल्याचे सांगीतले व आरोपि ने त्याचे वडील PDMC दवाखाना येथे उपचार घेत असल्याने त्यांच्या करीता फिर्यादिस जेवाचा डबा मागीतला फिर्यादिने आरोपि चे वडील भरती असल्याने दोन दिवस डबा दिला.तसेच आरोपिने मोबाईल देखील दिला होता दि.13/08/2023 रोजी दुपारी 15/00 च्या सुमारास फिर्यादिस पवन जवंजाळ चा कॉंल आला .व त्याने मला त्याचे मोबाईचे पैसे मागीतले असता.फिर्यादिने आरोपिस घरी पैसे देतो असे सांगितले.सदर ची बाब हि फिर्यादिने तीचे पतीस सांगितले. आज दि.14/08/2023 रोजी आरोपि सकाळी 08/00 वा.चे सुमारास घरी आला.त्यास फिर्यादिच्या पतीने आरोपिस मोबाईल चे पैसे दिले.व तो निघुन गेला.त्या नंतर आज 13/00 वाजेच्या सुमारास आरोपि पुन्हा फिर्यादिच्या घरी आला.तेव्हा फिर्यादि घरी एकटीच होती.तेव्हा आरोपि घरामध्ये जबरदस्तीने आत आला व आरोपिने फिर्यादिचा हात पकडुन घरा मध्ये ओढले व फिर्यादीची साडी ओढली ली त्यामुळे फिर्यादिस लाज वाटुन आल्याने फि.ने आरडा ओरडा केला असता.आजु बाजु चे लोक तेथे आले.व यांनी फिर्यादिस आरोपी पासुन सोडविले तेव्हा काही लोकांनी आरोपिस पकडुन मारहान केली.व तेव्हा तेथे पोलीस आले व सदर आरोपिस पकडुन पोलीस स्टेशन ला नेले व फिर्यादि पन पोलीस स्टेश ला रिपोर्ट देण्यास आली अशा फिर्यादिच्या जबानी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल |

जबरी चोरी:- ०१

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | राजापेठ अप क्र ७४८/२०२३ कलम ३९५, ३९७ भा.दं.वि. | छत्री तलाव रोड अमरवती | दि १४/८/२३ चे १८/०० वा दरम्यान<br><br>दि १४/०८/२३ चे २१/३८ वा | राहुल भगवानदास अहेरवार वय- २७ रा . बिजासेन मंदीर जवळ , मसानगंज अम. | १.यश कडु वय २३ रा मेहेरबाबा कॉलनी २.अभीषेक डीक्याव ,वय- २१ रा पोस्टमन कॉलनी , ३. रोहन राठोड वय- २५ रा अमरावती , ४. देवा मडावी वय- २२ रा जेवड नगर , ५. एक अनोळखी ईसम रा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फी. हा त्याचे शेजारी राहनारा प्रज्वल याचे सोबत छत्री तलाव येथे शंकर मंदिर जवळ असतांना मोबाईलने फोटो काढत होता येथे अचानक नमुद आरोपीतांनी येवुन तु याहापर क्या कर रहा है, असे म्हणुन आरोपी क्र. २ याने फी.चे डोक्यावर हॉकीने मारहान केली तसेच आरोपी क्र. १ याने फी.चे पायावर स्टम्प नी मारहान केली व चाकु दाखविला व यातील आरोपीतांना फी.ला मारहान करुन त्याचे गळ्यातील १.सोण्याती चैन १० ग्रॅम कीअं. ४०,००० रु. , २.मोबाईल विवो व्ही २० की.अं. १५,००० रु. ३.नगदी ३५०० रु. असा एकुन ५८,५०० रु चा माल जबरिने चोरुन नेला , अशा फियादीच्या जबाणी रिपोर्ट वरुण सदरचा गुन्हा दाखल |

➢ घरफोडी :- ०१

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | नागपुरी गेट अम. अप क्र. ४०२/२३ कलम ४५७, ३८० भादवी | फि. चे राहते घर हाजरा नगर अमरावती. | दि. १३/०८/२०२३ चे १९/०० वा.<br><br>१४/०८/२०२३ चे १३/१० वा. | मतीन शाह नबी शाह वय ३० रा. हाजरा नगर इस्माईल मस्जिद जवळ अमरावती. | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे ` की यातील फि. नमुद घटना ता.. वेळी व ठिकाणी आपल्या पत्नीला आणण्यासाठी घराला कुलुप कोंडा लावुन दयापुर येथे गेला असता आज रोजी फि. हा घरी आला त्याला घराचे लावलेले कुलुप तुटलेले दिसले घराच्या आतमध्ये फि. ने प्रवेश केले असता घरातील सामान अस्त व्यस्त पडलेले दिसले. घराच्या आतमध्ये लावलेली एक एलईडी बुश कंपनीची कि. ७०००/- रु. नगदी २०००/- रु. असा एकुण ९०००/- रु. चा माल व नगदी कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ चोरी:- ०२

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पोस्टे गाडगेनगर अप.क्र. १०१८/२३ कलम ३८० भा.द.वि. | केशव कालनी डी.डी.सी. कन्स्ट्रक्शन अम. | दि. २२.०७.२३ चे ००.०० वा ०५.००वा पर्यत दाखल दि. १४.०८.२३ चे १४.१४ वा | गोकुलेश गोविंदराव दम्माणी वय ४३ वर्ष. रा. केशव कालनी कम्प विद्याभारती कालेज रोड अमरावती | अज्ञात इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी फि. चे घरासमोर त्यांचे भाऊ ब्रजेश दम्माणी यांचे डी.डी.सी. नावाने कन्स्ट्रक्शन इमारत चे बांधकाम सुरु आहे तेथे लिफ्ट चे सामान फस्ट व ग्राऊंड फ्लोअरवर ठेवलेले असुन कोणीतरी अज्ञात चोराने नमुद खुल्या बांधकामाचे ठिकाणी आत प्रवेश करुन लिफ्चे सामान २५०००/- रु. व पाण्याची मोटार कि.अं. १०,०००/- रु चे एकुण ३५०००/- रु चे सामान चोरुन नेले अशा फि.चे जबानी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती अपक्र.१०१९/२३ कलम-४६१.३८० भादवी | भोडार गृह टिनाचे पत्राचे यंत्रणा कार्य. विधापीठ रोड अमरावती | घतावेळी दि.०९.८.२३ चे १८.३०वा ते १०.८.२३ चे १५.००वा<br>दाखल तावेळ दि.१४.८.२३ चे १८.१० वा | सुखदेव पांडुरंगजी खडसे वय- ५६ रा.अभियता बिल्डीग शासकिय निवास्थान कांतानगर अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकानी यातील फर्यादी हे त्याच्या आँफिस मध्ये असुन तेथे टिनाचे भांडार गृह गोडावुन हे नमुद घतावेळी व ठिकानी कोणीतरी अज्ञात चोराने टिनाचा पत्रा तोडुन आत प्रवेश केला व खालील प्रमाणे माल चोरुन नेला अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ वाहन चोरी :- ०३

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अम शहर अप नं ६३७/२०२३ कलम ३७९, भादवी | अमरावती | घ ता वेळ दि १३/०८/२०२३ चे १८/३० वा दरम्यान रि ता वेळ दि. १४/०८/२०२३ चे १६/२८ वा | भावसिंग दलुसिंग राठोड वय ७५ वर्ष धंदा घरकाम (सेवानिवृत्त उपअभियंता) रा जिवनज्योती काँलनी चैतन्य काँलनी जवळ जुनाबायपास रोड अमरावती | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातिल फियादीचे यांनी सन २०२१ मध्ये बाहेती ब्रदर्स जयस्तंभ चौक अमरावती येथुन नातु करीता हिरो थ्रोम काळया केपनीची काळया रंगाची हिरव्या रंगाची पट्टा असलेली फ्रेम नंबर ६०९०२ कि ७,१००/- रु ची नवीन सायकल घेतली होती दि १३.०८.२०२३ रोजी १८.३० वा सुमारास फिर्यादी चा नातु हा हिरो थ्रोम ब्लॅक केपनीची काळया रंगाची हिरव्या रंगाची पट्टा असलेली फ्रेम नंबर ६०९०२ कि ५,०००/- रु ची जुनी सायकल घेवुन अमरावती येथील ग्रउनडवर फुटबाँल खेळायला गेला परत येवुन पाहीले असता सायकल ग्रउनडवर नोव्हती अनोळखी दोन इसम हेल्मेट घातलेले त्याचेकडे होन्डा पँशन टुव्हीलर गाडी मागे बसलेला इसमाचे अंगात काळसर रंगाचा शर्ट घातलेला ग्राउडवर बाहेर फिरतांना दिसले तरी कोणीतरी अज्ञात इसमाने सायकल चोरुन नेली . अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | पो..स्टे सिटी कोतवाली अप क्र ३४९/२०२३ कलम ३७९ भादवी | खापर्डे बगीचा रोडवरील दिनेश बुब यांचे गणेश मंडळ समोर ईविण दवाखाण्या चे मागील गेट समोर अमरावती | गु.घ.ता.वेऴ दि.११/०८/२३ चे २०.०० वा ते २०.३० वा दरम्यान दा.ता.वेऴ १४/८/२३ चे २१.१५ वा | कुंदन सुभाष रौतळे वय २९ वर्षे रा खडकाळी पुरा अमरावती | अज्ञात | हकीकत अशाप्रकारे आहे की घ ता वेळी व ठिकाणीयातील फिर्यादी हे त्याचा भाचा समर्थ विलास उजाड` याला इलाजाकरीता ईविण दवाखाना येथे आले असता त्यांची गाडी खापर्डे बगीचा रोडवरील दिनेश बुब यांचे गणेश मंडळ समोर ईविण दवाखाण्याचे मागील गेट समोर अमरावती येथे उभी करुन ईविण दवाखाना येथे गेले व भाच्याला दवाखाण्यात भरती करुन बाहेर आले तेव्हा त्यांची गाडी हीरो होंडा सिडी डिलक्स गाडी क्र MH-२७ AQ ६८९९ काळया रंगाची निळा पटटा असलेली जिचा चेचीस क्र MBLHA११END९L०५६६८ इंजिन क्र HA११ECB९L००२५५ जुनी वापरती कि अं २००००रु ची ठेवलेल्या ठिकाणी दिसुन आली नाही कोणीतरी अज्ञात चोरानेचोरुन नेली अशा फिर्यादी चे जबानी रिपोर्ट वरुन व डि ओ सा`याचे आदेशान सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | पो..स्टे सिटी कोतवाली अप क्र ३५०/२०२३ कलम ३७९ भादवी | रेल्वे स्टेशन अमरावती | गु.घ.ता.वेऴ दि.९/०८/२३ चे १०.०० वा ते १७.०० वा दरम्यान दा.ता.वेऴ १४/८/२३ चे २३.१४ वा | राहुल रमेशराव भाकरे वय ३४ वर्षे रा शेदुरजना बाजार अमरावती ह मु जेवढ नगर अमरावती | अज्ञात | हकीकत अशाप्रकारे आहे की घ ता वेळी व ठिकाणीयातील फिर्यादी हे साळया कडे आले असता त्याची गाडी बिघडल्याने ते त्याचा साळा निंरजन पारवेकर रा जेवढ नगर अम याचें घरी गाडी हीरो होंडा पॅशन प्रो गाडी क्र MH-२७ Ah४८८७ काळया रंगाची असलेली जिचा चेचीस क्र MBLHA१०EP९GF००९८८ इंजिन क्र HS१०ED९GF०५६५१ जुनी वापरती कि अं २००००रु ची अशा वर्णनाची ठेवली होती ती गाडी दुरुस्ती करीता घेवुन जात होतो गॅरेज बंद असल्यमुळे ती रेल्वे स्टेशन चौक येथे उभी केली व घरी १२.०० वा निघुन आलो सायकाळी १७.०० वा दरम्यान गाडी पाहण्याकरीता गेलो असता त्यांची ठेवलेल्या ठिकाणी दिसुन आली नाही कोणीतरी अज्ञात चोरानेचोरुन नेली अशा फिर्यादी चे जबानी रिपोर्ट वरुन व डि ओ सा`याचे आदेशान सदरचा गुन्हा दाखल |

**विश्वासघात (फसवणुक) :- ०१**

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अम अप क्रं ६३८/२०२३ कलम ४१९ ४२० ४६५ ४६७ ४६८ ४७१ भादवी | राज्य राखीव बल गट क्रं १८ ( भारतीय राखीव बटालियन -५) काटोल जि नागपुर नवी निर्मिती असल्याने रा. रा. पो बल गट क्रं ०९ अमरावती येथे संलग्न अमरावती | दि ०९/१२/२०१४ चे १२/०० वा ते दि १४/०८/२०२३ चे १४.३० वा दरम्यान<br><br>घ ता वेळ दि. १४/०८/२०२३ चे १७.२५वा. | किशोर गोपाल चौधरी वय ५१ वर्ष धंदा नोकरी - पोलीस निरीक्षक रा रा पो बल गट क्रं १८ काटोल जि नागपुर | पोशी मनोज दादाजी राउत वय २८ वर्ष रा नवेगाव जि गडचिरोली ह मु कँम्प अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील नमुद फिर्यादी हे राज्य राखीव बल गट क्रं १८ ( भारतीय राखीव बटालियन -५) काटोल जि नागपुर येथे पोलीस निरीक्षक पदावर नोकरीवर असुन सदरचे बटालिय हे नवनिर्मित असल्यामुळे राज्य राखीव पो बल गट क्रं९ अमरावती येथे सलंग्र आहे . राज्य राखीव पो बल गट क्रं १८ येथे कार्यरत असलेला आरोपी हा नवेगाव जि गडचिरोली ह मु कँम्प अमरावती येथे नेमणुकीस असुन पो स्टे गडचिरोली येथे आरोपीवर अप क्र २९१/२०२३ कलंम ४१९,४२०,४६७,४६८,३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन चौकशी सुरु आहे त्याने खोटे प्रकल्पगस्त प्रमाणपत्र बनवुन घेवुन कार्यलय विभागाला सादर केले आहे व आरंक्षणाचा लाभा घेतला आहे. आरोपी यास ताब्यात घेवुन पोलीसांनी चौकशी केली असता सहभाग असल्याचा निष्पन्न झालेला नाही म्हणुन कायदेशीर कार्यवाही करण्यात आली नाही परंतु प्रकल्पगस्त प्रमाणपत्राचा आधार घेवुन सन २०१९ मध्ये रा रा पो बल गट क्रं १८ काटोल जि नागपुर कँम्प अमरावती येथे भरती मध्ये समांतर आरक्षण घतले असल्याचे निष्पन्न झालेले आहे तरी सदर प्रकरणाची चौकशी करु पुढील कायदेशीर कार्यवाही होणेबाबत कळविले त्यावरुन फिर्यादी यांनी जिल्हाधिकारी कार्यालय बिड येथे जावुन आरोपी यांचे प्रकल्पगस्त यांचे प्रमाणपत्राचे संपुर्ण कागदपत्राचे व संचिकेची निर्गमित छांयांकित प्रत प्रप्त केली व शाहानिशा केली असता सी आर क्र २० सन २०२१ हे चेक केले असता पान क्रं २७९ दि ०९.१२.१४ मधील अप क्रं २५९२ हे पाहीले असता त्यावर खोडाखाड केली असुन त्याच्यावर नरहरी सर्जेराव खडागडे हे अस्पष्ट खोडलेले दिसत असुन त्याच्यावर संबंधित कर्मचारीची काउनटर सह केली नाही व खाली मनोज दादाजी राऊत असे लिहलेले आहे अशा आमच्या प्राथमिक चौकशी वरुन तसेच आरोपी यांनी आमच्या वरुष्टांना दिलेल्या पत्रावरुन आरोपी याने सेवा प्रवेश करतांना भरतीमध्ये बनावट प्रकल्पगस्त् प्रमाणपत्राचा आधार घेवुन आरक्षण घेतले असल्याने निष्पन्न होत असल्याने आरोपी याच्यावर पुढील कार्यवाही होण्यात विनंती आहे अशा फिर्यादी याच्या लेखी न रिपोटवरुन डि ओ याच्या आदेशाने अप सदरचा गुन्हा दाखल |

➢ अपघात :- ०१

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | आरोपीचे नाव व पत्ता (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | भातकूली अप नं. 163/23 कलम 279,337 भादवि | चेचरवाडी रोड ते भातकूली रोड दर्गा जवळ ता. भातकूली जि. अमरावती | घटना ता वेळ दि. 14-08-2023 चे 20/00 वा. दरम्यान दाखल ता वेळ दि. 14-08-2023 चे 21/45 वा. | वैभव प्रविणदास देशमूख वय 23 वर्षे धंदा शेती रा. चेचरवाडी ता. भातकूली जि. अमरावती मो.नं. 8329027409 | मोटर सायकल क्र. MH 27 AV 0116 चा चालक<br><br>दाखल अधि. HC मूस्ताक बं.नं. 1014 पो.स्टे. भातकूली | हकीकत अश्या प्रकारे आहे की, नमूद घटना ता वें व ठिकानी सदर फिर्यादी व त्याचा मित्र नामे योगेश अशोकराव देशमूख असे किराणा घेण्यासाठी भातकूली येथे त्याची मोटर सायकल क्र. MH 27BR 3243 ने जात असतांना विरूध्द दिसेने चेचरवाडी रोड ते भातकूली रोड दर्गा जवळ भातकूली कडून मोटर सायकल क्र. . MH 27 AV 0116 चे चालकाने त्याचे गाडीवर बोर्ड घेउन जात असतांना आपली गाडी भरधाव वेगाने व हयगयीने चालविल्याने त्याचे गाडीवरील बोर्ड फिर्यादीचे उजवे हाताचे तीन बोटाला लागल्याने जखम झाली व रक्त निघत आहे अश्या फि. च्या जबानी रिपोर्ट व मेडीकल सर्टि वरून गून्हा सदरचा दाखल करून तपासात घेतला |

➢ ईतर :- ०३

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | नागपुरी गेट अप क्र. ४०१/२३ कलम २९४, ३२३, ५०४ भादवी सहकलम ४, २५ आर्म अँक्ट सहकलम १३५ मपोका | रतनगंज नागोबा ओटा न. ३ अमरावती. | दि. १४/०८/२०२३ चे ९/३० वा.<br><br>दि. १४/०८/२०२३ चे १२/१४ वा. | एक महीला | सुरज गुलाबराव परतेकी वय ३२ रा. रतनगंज नागोबा ओटा अमरावती. | हकीकत अशा प्रकारे आहे ` की यातील फि. यांचे लग्न दोन वर्षापुर्वी झाले असुन अधिक महिना असल्यामुळे फि. हि आईकडे आली असता नमुद घ.ता. वेळी व ठिकाणी यातील फि. हे मोहल्यातुन कावड यात्रा असल्याने आई सह कावड यात्रा बघण्यासाठी आली असता मोहल्यातील आरोपी हा त्या ठिकाणी आला व फि. ला तु माझ्या नजरेसमोर फिरु नको असे म्हणुन फि. ला येथुन जा नाही तुले सोडणार नाही. असे म्हणुन आरोपी यानी घरात जावुन एक लोखंडी सत्तुर आणुन अश्लिल भाषेत शिवीगाळ केली व आरोपी हा फि. चे अंगावर येवुन उलटा सत्तुर मारला. आरोपी यांनी लोकांसमोर शिवीगाळ केली असल्याने फि. यांच्या मनाला धक्का लागल्याने व आरोपी यांनी लोखंडी सत्तुर घेवुन अंगावर आल्याने लोटलाट केल्याने. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २. | नागपुरी गेट अप क्र. ४०४/२३ कलम २०,२२,२९ Ndps act | पठाण चौक बब्बु किराणा गल्ली मध्ये आरोपीचे घरासमोर | दि. १४/०८/२३ चे १८/०५ ते २०.०० वा. दरम्यान<br><br>दि. १४/०८/२०२३ चे २२/३७ वा. | सपोनी योगेश विनायकराव इंगळे रा गुन्हे शाखा अमरावती | १.मोहम्मद शाहरूख मोहम्मद रफिक वय ३२ वर्ष रा जुबेर अली क्लिनिक जवळ पठाण चौक अमरावती<br>२. फरार आरोपी शेख नौशाद शेख रसुल वय अंदाजे ३८ वर्ष रा गुलीस्ता नगर अमरावती अफजल चौधरी च्या घराजवळ अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे अंमली पदार्थाचे विक्री करणारे ईसमाची माहिती काढणे करिता आयुक्तालय हद्दीमध्ये पेट्रोलिंग करिता असता गुप्त बातमीदाराकडुन खात्री लायक माहिती मिळाली कि ईसम नामे मोहम्मद शाहरूख मोहम्मद रफिक वय ३२ वर्ष रा जुबेर अली क्लिनिक जवळ पठाण चौक अमरावती हा निळया रंगाचे कॉलेज बॅग मध्ये गांजा नावाचा अंमली पदार्थ पाउच आपले घराजवळील लोकांना विक्री करित अशी माहिती मिळाल्यावरून वरिश्ठांना माहिती देवुन त्याचे परवानगी मिळाल्यानंतर पो स्टाफ रेड करणे करिता रवाना होवुन घटनास्थळी जावुन पाहणी केली असता तेथे एक ईसम आपल्या हातात कॉलंज बॅग बाळगुन फिरतांना दिसुन आला वरुन पंचानी व पो स्टाफ यांनी खात्री पटल्यानंतर त्याला थांबवुन त्याचे नाव पत्त विचारले असता त्याने त्याचे नाव मोहम्मद शाहरूख मोहम्मद रफिक वय ३२ वर्ष रा जुबेर अली क्लिनिक जवळ पठाण चौक अमरावती असे सांगितले वरुन त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यातुन १.एक लालरंगाची कापडी पिशवी ज्यामध्ये डंदड्डींतप इमामतल छंउाममद असे नमुद असलेली ज्यामध्ये १३४ प्लास्टीक पाउच मध्ये तसेच ४ कागदी बंडल मध्ये ओलसर असलेला गांजा नावाचा अंमली पदार्थ असलेली कापडी पिशवी सह सदर गांजा माल असलेल्या संर्पुण प्लास्टिक पाउच आणि कागदी बंडलचे वनज १.०७२ कि ग्रॅ ज्याची किंमत १०००० रू सिलबंद केल्यानंतर वनज १.०८७ कि ग्रॅ<br>२.एक काळया निळया रंगाची कॉलेज बॅग ज्यावर `ालइंहे असे नमुद असलेली किं ५०० रू ३.आरोपी मोहम्मद शाहरूख मोहम्मद रफिक वय ३२ वर्ष रा पठाण चौक अमरावती याचे अंगझडती मध्ये मिळालेला गांजा पाउच विक्रीचे नगदी ३०० रू ४. आरोपी मोहम्मद शाहरूख मोहम्मद रफिक याचा जुना वापरता सॅमसंग कंपनीचा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | मोबाईल कि ५०० रू असा एकुण ११३०० रू चा माल मिळुन आला सदरचा माल जागीच सिलबंद करून ताब्यात घेतला त्याला सदरचा माल कोणाचा आहे कोठुन आणला याबाबत पंचासमक्ष विचारपुस केली असता त्याने सदरचा माल नौशाद शेख रसुल वय ३० वर्ष रा गुलीस्ता नगर अफजल चौधरी यांचे घराजवळ अमरावती यांचा असल्याचे सांगितले वरून आरोपी मोहम्म्द शाहरूख मोहम्मद रफि याला ताब्यात घेवुन फरार आरोपी शेख नौशाद शेख रसुल याचा शोध घेतला मिळुन आला नाही वरील दोन्ही आरोपीचे कृत्य कलम लम २०, २२,२९ **Ndps act** होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |
| **३.** | **पो..स्टे सिटी कोतवाली अप क्र ३४८/२०२३ कलम १३५ महा राष्ट्र पोलीस अधिनियम ३ महाराष्ट मालमत्ता विरुपणास प्रतिबंध अधि कलम २६९ भादवी** | **महानगर पालिका अमरावती** | **गु.घ.ता.वेळ दि.१४/०८/२३ चे १२.०० वा दा.ता.वेळ १४/८/२३ चे १८.३३ वा** | **सपोनि पुजा खांडेकर मॅडम पोस्टे सिटी कोतवाली अम शहर** | **१.पराग गुडधे २.शाम देशमुख ३.प्रविण हरमकर ४.संजय शेटे ५.पंजाबराव तायवाडे सर्व राहणार अमरावती** | **हकीकत अशाप्रकारे आहे की, आम्ही सपोनि पुजा खांडेकर सहा पों नि या पदावर पोस्टे कोतवाली येथे नेमणुकीस असुन आज दि.१४/८/२३ रोजी महानगर पालिका येथ्ने शिवसेना उध्दव ठाकरे गटातर्फे आयोजीत मोर्चा बेंदोबस्त कामी पोलीस स्टाफ पोस्टे कोतवाली येथील वपोनि वाकसे पेनि गुन्हे विल्हेकर मॅडम तसेच ASI ९५८,८४५,९२१ HC१०२१,११६४ NPC १७०,८४,१३५४, १२, १४२५, ३२८ PC १५५२,१६२६ LPC ११७४ असे पोस्टाप सह मनपा येथे हजर होते अंदाजे १२.०० वासमुारास शिवसेना उ बा ठा गटाचे ५० ते६० कार्यकर्ते व श्री पराग गुडधेयांचे नेतृत्वात मनापा येथे आले त्यांना मनपा गेटसमोर अडविण्यात आले त्यांनी सोबत घाणेरडा कचरा लोटगाडी वर सोबत आणला मनपा आत जावु दयाअसे मोर्चकर-यानी आग्रह केला असता तयानां कचरा घेवुन आत जाता येणार नाही असे सांगुण अडविण्यात आले तेव्हा त्यांनी सेबत आणलेला घाणेरडा कचरा मनपा गेट समोर टाकला व शिवसेना जिंदाबाद व इतर घोशणाबाजी केली मोर्चा तील शिष्ठमंळांनी चर्चा केली व साफसफाई कचरा व इतर समस्याचे निवेदन देण्यात आले १३.४० वा सर्व मोर्चकरी मनपा येथुन निघुन गेले सपोआ आयुक्तालय अमरावती कार्यक्षेत्रा मा पो आयुक्त अम यांचा आदेश क्र पोआअ/विशा/ कावसु/२९/०९/२०२३ चे दि ०८/०८/२०२३ अन्वये कलम ३७ (१)(३) मपेका अन्वये अधि सुचना व आदेश निर्गमीत करण्यात आला असुन जमावाच्या मानसाच्या एकत्रीकरण करण्यास मनाई करण्यात आली आहे असे असतांना सुध्दा शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे १.पराग गुडधे २.शाम देशमुख ३.प्रविण हरमकर ४.संजय शेटे ५.पंजाबराव तायवाडे अधीक ४० ते ५० कार्यकर्ते यांनी कलम ३७ (१)(३) मपोका ओदशाचे उल्लघंन करुन विनापरवाना मनपा कार्यालय येथे मोर्चा काढुन घोष्णाबाजी करुन घाणेरडा कचरा मनपा गेट समोर टाकुन आंदोलन केल्याने त्याचेविरुध्द कलम कलम १३५ महा राष्ट्र पोलीस अधिनियम ३ महाराष्ट मालमत्ता विरुपणास प्रतिबंध अधि कलम २६९ भादवी अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात आली** |

➢ अकस्मात मृत्यु :- १

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण | चौकशी अधिका-यांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | पो.स्टे. बडनेरा अमरावती शहर मर्ग क्र. ६०/२३ कलम १७४ जा.फौ | वॅगन कारखाना जवळ दुर्गापुर रोड बडनेरा | पुरूष जातीचा एक अनोळखी ईसम | सुरज रविंद्र खैरकार वय ३१ रा. उप स्टेशन बडनेरा | रेल्वे ने अपघात | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ.ता. वेळी व ठिकानी दि. १४.०८.२०२३ रोजी सकाळी ११.०० वा. पो. स्टे. ला तक्रार दार नामे सुरज रविंद्र खैरकार वय ३१ रा. उप स्टेशन प्रबंधक बडनेरा यांनी माहिती दिली की, के.एम. ६५९—१८२०द डाउन टाईम चे बाजुला एक अनोळखी ईसमचा रेल्वेने अपघात होवुन मृत पावला आहे रीपोर्ट वरून सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला. | पो.उपनि. मेघाली गावंडे पो. स्टे. बडनेरा अमरावती शहर |

➢ जुगार रेड :- ३

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा | अप क्र ६३९/२० २३ कलम १२ अ म. जु.का. | फरशी स्टाफ चवरे मार्केट कवर नगर अमरावती | दि. १४.०८.२०२३ चे १५.१० वा. | दि. १४.०८.२०२३ चे १९.४७ वा. | सहा पो.उपनि प्रविण इखार ब.नं. ८५९, पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती | (१)महेश दिलीप कंकाळ वय ३० वर्ष, रा. लकडगंज नवीन वस्ती बडनेरा (२)प्रेमकुमार यशवंत सरोदे वय ६० वर्ष, रा. चिचफैल अमरावती | हकीगत अशा प्रकारे आहे कि, सपोनि महेश इंगोले पो.उपनि राजकिरण यवले व गुन्हे शाखेचे कर्मचारी असे आयुक्तालय हद्दीत मा. पो.नि. गुन्हे शाखा यांचे आदेशाने गुन्हेगार चेकींग व अवैध धंद्यावर रेड करणेकामी पेट्रोलिंग करित असतांना गुप्त माहीतीवरुन नमुद ठिकाणी रेड केली असता दोन ईसम १ ते १० आकड्यावर वरली मटक्याच्या चिठ्या देवुन लोकांकडुन पैसे घेवुन हारजीतचा जुगार खेळ खेळवित असतांना दिसले पो.स्टाफचे मदतीने त्यांना ताब्यात घेवुन आरोपीतांचे ताब्यातुन पंचासमक्ष १ ते १० वरली मटका आकडे लिहलेल्या दोन चिठ्या नगदी २३००/- रु. एक बॉलपेन कि.अं. २० रु. असा एकुण २३२०/- रु. चा माल जप्त करुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | फ्रेजरपुरा | अपक्र ६४०/२३ कलम १२ अ म.जु. का | यशोदा नगर नंबर २ गल्ली नं. १ अमरावती | दि. १४.०८२३ चे १६.४५ वा | दि. १४.०८.२३चे २०.१६ वा. | पो हवा योगेश श्रीवास ब.नं. १०१५, पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | (१)गणेश मुरलीधर मेहरे वय ५२ वर्ष, रा. चिचफैल मरिमाता मंदिराजवळ अमरावती (२) रोशन मुन्ना मांजरे वय ३१ वर्ष, रा. गवळीपुरा अमरावती | हकीकत अशाप्कारे आहे की यातील नमुद घटनातावेळी व ठिकाणी फिर्यादी हे पोस्टाफसह पेट्रोलिंग करीतअसता गोपनिय माहितीवर जावुन रेड केली असता यातील नमुद आरोपी वरली मटका आकडे लिहुन कागदी चिठ्या देवुन पैसे घेना-या ईसम तसेच वरली मटका जुगार खेळावर पैसे लावनारा ईसम जागीच हजर मिळुन आले त्यांना ताब्यात घेवुन दोन चिठ्या नगदी १६५०/- रु. एक निळया साहीचा बॉलपेन कि. ५ रु. एकुण १६५५/- रु. चा मुद्देमाल जप्त करुन आरोपीविरुध्द सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | नागपुरी गेट | अप नं ४०३/२३ कलम १२ अ म जु का | युसुफ पॅलेस समोर ताजनगर अमरावती | दि.१४.०८.२०२३ चे १८.०५वा | दि.१४.०८.२०२३ चे २०.११ वा | सरतर्फे पोहेका संतोष रामलाल यादव ब न १८८ पो स्टे | मोसीन शहा युसुफ शहा वय ३० वर्ष रा हमीद भाई हॉटेल यांच्या घराजवळ ताज नगर नं २ अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि, नमुद घ ता वेळी व ठिकाणी मिळालेल्या गुप्त माहितीवरून नमुद आरोपी यांच्या वर पंचासमक्ष व पो स्टाफ यांच्या मदतीने वरली मटका जुगार रेड केली असता आरोपी यांचे ताब्यातुन नगदी ११०० रू,१ ते १० आकडयाचा वरली मटका जुगाराच्या चिठ्ठया ,एक बॉल पेन किं १० रू असा एकुण १११० रू चा माल मिळुन आला करिता नमुद आरोपी यांचे वर कलम १२ अ म जु का प्रमाणे दाखल |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | नागपुरीगेट | | |

➢ **प्रोव्हीशन रेड :- ०५**

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १. | बडनेरा | अप.क्र.५९३/ २०२३ कलम ६५(ई) महा.दा.का. | आरोपीचे राहाते घरी अन्नाभाऊ साठे नगर जुनीवस्ती बडनेरा | दि.१४.०८. २०२३ चे २०.०० वा. | दि.१४.० ८.२०२३ चे २२.३८ वा. | सरतर्फे नापोकॉ रोशन निसंग ब.नं.९४५ , पो.स्टे.बडनेरा , अमरावती शहर | निलेश तुकाराम वानखडे वय ३५ वर्ष I रा अन्नाभाऊ साठे नगर जुनी वस्ती बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फि.हे स्टाफसह पो.स्टे.हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहितीवरून नमुद घटना.ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपीवर प्रो.रेड केली असता त्याच्या हातातील पिशवीची पाहणी केली असता त्यामध्ये ७० नग देशी दारू बॉबी संत्रा प्रत्येकी ९० मि.ली.च्या सिलबंद बॉटल किं.अं.२४५० रू.चा माल मिळुन आला. आरोपीचे सदरचे कृत्य हे कलम ६५(ई) महा.दा.का.प्रमाणे गुन्हा होते. अशा फि.चे लेखी फिर्यादीवरून सदरचा गुन्हा दाखल |
| २. | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती | अपक्र. १०२०/२३ कलम- ६५ ई मदाका | पत्रकार कॉंलनी अमरावती | गुतावेळ् दि. १४.८.२०२ ३ चे १८.३० वा | दि.१४.८ .२०२३ चे २१.१६ वा | सरतर्फे नापोका गजानन बरडे बन ९८० पोस्टे गाडगेनगर ्मरावती | नाही | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेऴी व ठिकानी यातील फिर्यादी व पोस्टेचे स्टॉफ सह पेट्रोलींग ड्युटी वर असताना अंदाजे १८.३०वा गोपनिय माहीती मिऴाली की, नमुद ठिकानी एक इसम हा अँक्सेस गाडीवर दारु विक्री करीत असुन नमुद ठिकानी पोस्टेचे स्टॉफ सह व पंचा समक्ष गेलो असता नमुद आरोपी याच्या ताब्यातुन १.३१००/- रु किमतीचे ४८ नग बॉंबी संत्रा कंमपनीचे देशी दारुच्या काचेच्या बॉंटल १८० मिली आकाराच्या ,२. ३१००/- रु किमतीचे ४८ नग बॉंबी संत्रा कंमपनीचे देशी दारुच्या काचेच्या बॉंटल १८० मिली आकाराच्या एकुन ९६ नग पावट्या कि.अ. ६२००/- रु ३. ३००००/- रु. एक अँक्सेस गाडी काऴ्या रेगाची क्र.एम एच २७ ए वाय ०६७९ /-रु पंचा एकुन माल ३६२००/- रु.चा माल पंचा समक्ष जप्त करण्यात आले अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३. | वलगाव | अप क्र.256/2023 कलम 65 ई म.दा.का. | दि.ग्राम रामा. | दि.14/08/2023 चे वा. | दि.14/08/2023 चे 20/47 वा. | ASI निवासराव घुगे ब.न.706 पोस्टे वलगाव अमरावती | गजानन रामरावजी घरडे व य 55 वर्ष रा.ग्राम रामा ता.भातकुली जि.अव | आज दि. 14/08/2023 रोजी 09/00 ते 21/00 वा. पो.स्टे. हजर ड्युटी असतांना मा. व.पो.नि. सुरेंद्र अहेरकर सा. यांचे आदेशाने पो.स्टे. चे साना क्र. 20/23 प्रमाणे आम्ही व सोबत ना.पो.क. 1337 असे खाजगी वाहनाने रवाना होऊन बिट क्षेत्रात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, ग्राम रामा येथे बौद्ध विहाराजवळ ,गजानन घरडे त्याचे घरासमोर अवैधरित्या देशी दारुच्या पावट्या लोकानकडुन पैसे घेऊन विकत आहे. अशी खात्रीलायक माहीती मिळाल्यावरुन आम्ही व सोबत ना.पो.क. 1337 असे खाजगी वाहनाने ग्राम रामा गेलो व तेथुन दोन पंचांना सोबत घेऊन त्यांना मिळालेल्या गुप्त बातमी बाबत माहीती देऊन आम्ही सोबत पंच व पो. स्टफ असे ग्राम रामा येथे बौद्ध विहाराजवळ ,गजानन घरडे यांचे घराजवळ लपत छपत गेलो असता, तेथे एक ईसम पांढ-या कापडी पिशविमध्ये अवैधरित्या दारु विक्री |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | करीत असतांना दिसुन आला. आम्ही व पो. स्टफने त्याचेवर 16/30 वा. दरम्यान प्रो. रेड केली असता पोलीसांची चाहुल लागताच दारु विकत घेणारे ईसम तेथुन पळुन गेले, परंतु अवैध्य दारु विक्री करणा-या ईसमास जागीच ताब्यात घेऊन त्यांचेजवळील पांढ-या कापडी पिशवीची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यामध्ये देशी दारुच्या 180 M.L. च्या पावट्या दिसुन आल्या पंचासमक्ष त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी आपले नाव गजाननराव रामरावजी घरडे वय 55 वर्षे रा. रामा ता. भातकुली जि. अमरावती असे सांगीतले त्यास पंचासमक्ष देशी दारुचे परवाण्याबाबत विचारणा केली असता त्यांचे कडे दारु पिण्याचा, विक्रीचा, वाहतुकीचा, साठवणुकीचा कोणताही परवाणा मिळुन आला नाही. त्याचे ताब्यातुन देशी दारु बॉबी संत्रा 180 ML च्या एकुण 10 पावट्या मिळुन आल्या.वरुन सदर आरपि विरुध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.अशा फिर्यादिच्या जबानी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल |
| ४. | वलगाव | अप क्र.257/2023 कलम 65 ई म.दा.का. | ग्राम रामा | घटना ता.वेळ.दि.14/08/2023 चे 18/45 वा. | दि.14/08/2023 चे 22/49/वा. | ASI निवासराव घुगे ब.नं. 706 पो.स्टे. वलगांव अमरावती शहर | नामे गुणवंत विश्वनाथ चव्हाण वय 47 वर्षे रा. रामा. ता. भातकुली जि. अमरावती याचे विरुद्ध कलम 65(ई) म.दा.का प्रमाणे | आज दि. 14/08/2023 रोजी 09/00 ते 21/00 वा. पो.स्टे. हजर ड्युटी असतांना मा. व.पो.नि. सुरेंद्र अहेरकर सा. यांचे आदेशाने पो.स्टे. चे साना क्र. 20/23 प्रमाणे आम्ही व सोबत ना.पो.कॉ. 1337 असे खाजगी वाहनाने रवाना होऊन बिट क्षेत्रात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, ग्राम रामा येथे गुणवंत चव्हाण हा त्याचे घरासमोर अवैधरित्या देशी दारुच्या पावट्या लोकानकडुन पैसे घेऊन विकत आहे. अशी खात्रीलायक माहीती मिळाल्यावरुन आम्ही व सोबत ना.पो.कॉ. किशोर ब. नं. 1337 असे खाजगी वाहनाने ग्राम रामा गेलो व तेथुन दोन पंचांना सोबत घेऊन त्यांना मिळालेल्या गुप्त बातमी बाबत माहीती देऊन आम्ही सोबत पंच व पो. स्टॉफ असे ग्राम रामा येथे गुणवंत चव्हाण यांचे घराजवळ लपत छपत गेलो असता, तेथे एक ईसम पांढ-या कापडी पिशविमध्ये अवैधरित्या दारु विक्री करीत असतांना दिसुन आला. आम्ही व पो. स्टॉफने त्याचेवर 18/45 वा. दरम्यान प्रो. रेड केली असता |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | पोलीसांची चाहुल लागताच दारु विकत घेणारे ईसम तेथुन पळुन गेले, परंतु अवैध्य दारु विक्री करणा-या ईसमास जागीच ताब्यात घेऊन त्यांचेजवळील पांढ-या कापडी पिशवीची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यामध्ये देशी दारुच्या 90 M.L. च्या पावट्या दिसुन आल्या पंचासमक्ष त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी आपले नाव गुणवंत विश्वनाथ चव्हाण वय 47 वर्षे रा. रामा. ता. भातकुली जि. अमरावती असे सांगीतले त्यास पंचासमक्ष देशी दारुचे परवाण्याबाबत विचारणा केली असता त्यांचे कडे दारु पिण्याचा, विक्रीचा, वाहतुकीचा, साठवणुकीचा कोणताही परवाणा नसल्याचे त्याने पंचासमक्ष कळविले. त्याचे ताब्यातुन देशी दारु बॉबी संत्रा 90 ML च्या एकुण 12 पावट्या मिळुन आल्या. त्याचे कडुन खालील वर्णनाचा माल पंचासमक्ष ताब्यात घेतला.<br>420/- रु.= देशी दारु बॉबी संत्रा 90 ML च्या प्लास्टीकच्या एकुण 12 नग पावट्या प्रत्येकी किंमत 35/- रु. नग प्रमाणे.<br>वरिल प्रमाणे नमुद वर्णनाची व किंमतीच्या देशी दारुच्या पावट्या आम्ही जागीच पंचासमक्ष ताब्यात घेवुन त्यापैकी एक पावटी सि.ए. सॅम्पल करिता वेगळी काढुन त्यावर आमचे व पंचांचे सहीचे कागदी लेबल चे सिल लावुन जागीच सिलबंद केले. तरी दिनांक 14/08/2023 रोजी दुपारी 18/45 वा. नमुद आरोपी हा विनापास, विनापरमिट देशी दारु कब्जात बाळगुन अवैधरित्या देशी दारु विर्की करताना मिळुन आला. सदर इसमाचे हे कृत्य कलम 65 (ई) म.दा.का. प्रमाणे गुन्हा होत असल्याने त्याचे विरुध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे. |
| ५. | भातकुली . | अप नं. 164/23 कलम 65(ई) मदाका | आरोपी चे राहत्या घरासमोर ग्राम | घटना ता दि. 14-08-23 चे् 21/30 | दाखल ता.दि. 14-08-2023 | सरतर्फे NPC संजय मोहोड बं.नं. 1384 पो.स्टे. | चरणदास उत्तमराव रौराळे वय 54 वर्षे रा. खालकोनी ता. भातकूली जि. | हकीकत अश्या प्रकारे आहे की, नमूद घटना ता वेी व ठिकानी फिर्यादी पोलीस स्टाप नाईट डीओ ASI 824,PC 1632 असे पो.स्टे. हद्दीत विशेष मोहीम राबवीत असता गूप्तबातमीदाराकडून खात्रीलायकबातमी मिळाली की, ग्राम खालकोनी येथे एक ईसम आपले घरासमोर अवैध्द दारू विक्री करीत आहे अश्या माहीती वरून फिर्यादी व पो.स्टाप सह खालकोनी येथे गेले असता दारू विक्री |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | खालकोनी ता. भातकूली जि. अमरावती | वा. ते 22/30 वा. दरम्यान | चे 22/59 वा. | भातकूली | अमरावती | करनारा ईसम जागीच मिळून आला त्याचेवर पंचासमक्ष आरोपीवर प्रोव्ही रेड केली असता तो स्वता जवळ अवैध्दरित्या देशी दारू पावट्या विक्री करीता बाळगत असतांना मिळून आला त्याच्या ताब्यातून जप्ती पंचनाम्याप्रमाने 13 नग देशी दारूबाँबी संत्रा पावट्या 180ml च्या किमंत अंदाजे 1040 रू चा माल मिळून आल्याने गून्हा सदरचा दाखल करून तपासात घेतला .<br>दाखल अधिकारी –ASI रायचंद बं.नं. 824 पो.स्टे. भातकूली |